**महाराष्ट्र पोलीस शिपाई संवर्गातील सन २०२० मधील रिक्त पदे भरण्यासाठी OMR पध्दतीने लेखी परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**गृह विभाग, मंत्रालय,**
**शासन निर्णय क्रमांक-पोलीस-११२२/प्र.क्र.१४०/पोल-५अ,**
**मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : २८ जून, २०२२.**

<u>संदर्भ :-</u>
१. शासन निर्णय,गृह विभाग,क्र.पोलीस-१८२०/प्र.क्र.८८/पोल-५अ, दि.२१/०१/२०२१
२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) क्र.मातंसं-२०२२/ प्र.क्र.०१/से-२/३९, दि.१८/०१/२०२२
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-११२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.०४/०५/२०२२
४. शासन निर्णय, गृह विभाग क्र.पोलीस-१८१९/प्र.क्र.३१६/पोल-५अ, दि.१०/१२/२०२०
५. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्रशि/पो.शि.भरती/रिक्त पदे माहिती/ १३२/ २०२०/ २०८८, दि.२७/०६/२०२२

**<u>प्रस्तावना :-</u>**

भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत संदर्भाधिन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०४/०५/२०२२ अन्वये एकत्रित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदरहू सुचना विचारात घेता राज्यातील पोलीस शिपाई भरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी कोणती पध्दत निश्चीत करावी, या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत विचार विनिमय करण्यात आला. त्यानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने संदर्भ क्र.५ अन्वये OMR पध्दतीने लेखी परीक्षा पध्दत घेण्याबाबत समर्थक कारणासह प्रस्ताव सादर केला असून त्यानूसार परीक्षा पध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

१. सन २०२० मधील पोलीस शिपाई संवर्गातील ७२३१ रिक्त पदे भरण्यास संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असुन सदरची रिक्त पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणून OMR पध्दतीने लेखी परीक्षा प्रक्रिया राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. OMR आधारीत लेखी परीक्षा प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाने दिलेल्या सुचना/ आदेशांचा अवलंब करून सन २०२० मधील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करावी.

३. सदरहु परीक्षा पध्दतीच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचना/ आदेशानूसार पोलीस महासंचालक यांनी पोलीस शिपाई भरतीबाबत सविस्तर परिपत्रक निर्गमित करून त्याबाबत घटकांना सुचना द्याव्यात.

४. सदरची भरती पक्रिया पारदर्शीपणे राबविण्याची व सनियंत्रण करण्याची संपुर्ण जबाबदारी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील. परीक्षांसंदर्भात आक्षेप/वाद/ न्यायालयीन प्रकरण/ विधानमंडळ कामकाजविषयक बाबी उद्भवल्यास, त्याची जबाबदारी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व त्यांच्या अधिनस्त संबंधित घटक/ गट प्रमुखांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६२८१७०५४१७२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL EKNATH KULKARNI

Digitally signed by ANIL EKNATH KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=a68ace8f470aec5d6a18e832ae4a8b4d7804aba280ecdb8c3db114bd3cb1c2ac, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=04A7B4319163F6C965DD5CCDF92A74288C731F37328C1327B237008EB8DDC2D4, cn=ANIL EKNATH KULKARNI
Date: 2022.06.28 17:09:03 +05'30'

**(अ.ए.कुलकर्णी)**
**सह सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
८) पोलीस उपमहानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई.
९) कक्ष अधिकारी (पोल-४), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) संग्रहार्थ / पोल-५अ